या समवेत:- गुरुवार दिनांक- ०५ / ०६/२०२५ रोजी सकाळी ११.०० वा. प्राप्त झालेल्या अहमनगर जिल्हा परिषदेच्या, स्थायी समिती सभेचे कामकाज कार्यवृत्त जोडले आहे.

अहमनगर जिल्हा परिषद
सामान्य प्रशासन विभाग
क्र.साप्रवि-१/परिषद/स्थायी सभा/ ३७४ /२०२५
अहिल्यानगर, दिनांक-०१/०७/२०२५

प्रत माहितीसाठी सादर,

१. मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहिल्यानगर
२. मा. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, अहिल्यानगर
३. मा.प्रकल्प संचालक,जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा, अहिल्यानगर
४. खाते प्रमुख सर्व

२/-आपल्या खात्यासंबंधी विषय व त्याबाबतचे ठरावासंबंधी, तसेच सभेमध्ये झालेल्या चर्चेत उपस्थित केलेल्या प्रत्येक मुददयावर उचित कार्यवाही करुन त्याचा अनुपालनचा लेखी अहवाल सामान्य प्रशासन विभागास त्वरीत पाठवावा,म्हणजे पुढील स्थायी समिती सभेस अनुपालन सादर करता येईल.

(राहुल शेळके)
सचिव,स्थायी समिती सभा तथा
उप मुख्य कार्यकारी अधिकारी,(सा.)
जिल्हा परिषद, अहिल्यानगर

स्थायी समिती सभा गुरुवार दिनांक ०५/०६/२०२५ रोजी सकाळी ११.०० वा. सभेचे कार्यवृत्त

हजर अधिकारी

अ.क्र.	नाव	अ.क्र	नाव
१	मा.श्री.आनंद भंडारी प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी	२	मा.श्री.संभाजी लांगोरे अति.मुख्य कार्यकारी अधिकारी
३	श्री.राहुल शेळके सचिव स्थायी समिती तथा,उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि)	४	श्री.शैलेश मोरे मुख्य लेखा व वित्त अधिकारी
५	श्री दादाभाऊ गुंजाळ उपमुख्य कार्यकारी अधिकारी,(ग्रा.पं.)	६	श्री.सुभाष सातपुते प्रभारी प्रकल्प संचालक जलजीवन मिशन
७	श्री मनोज ससे जिल्हा कार्यक्रम अधिकारी (मबाक)	८	श्री सागर चौधरी कार्यकारी अभियंता (सा.बां.दक्षिण)
९	श्री.बाळासाहेब ननवरे कार्यकारी अभियंता (सा.बां.उत्तर)	१०	श्री.दिलीप सोनकुसळे प्र.उपजिल्हा कार्यक्रम समन्वयक (मग्रारोहयो)
११	श्री.डपकर शिवम प्रभारी जिल्हा जलसंधारण अधिकारी (ल.पा)	१२	श्री श्रीरंग गडधे प्रभारी कार्यकारी अभियंता,(ग्रा.पा.पु.)
१३	श्री सुधीर शिंदे कृषि विकास अधिकारी	१४	डॉ.श्री दशरथ दिघे जिल्हा पशुसवंर्धन अधिकारी
१५	डॉ.श्री बापूसाहेब नागरगोजे जिल्हा आरोग्य अधिकारी	१६	श्री.भास्कर पाटील शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
१७	श्री.अशोक कडूस शिक्षणाधिकारी (माध्यमिक)	१८	श्री देविदास कोकाटे जिल्हा समाज कल्याण अधिकारी
१९	श्री राजु लाकुडझोडे उपमुख्य लेखा व वित्त अधिकारी	२०	श्री. निखिल पठारे प्र.उप अभियंता (भु.स.वि.यो.)
२१	श्री बाळासाहेब बुगे शिक्षणाधिकारी (योजना)		

विषय क्रमांक १:- दि. ५/०५/२०२५ रोजीची स्थायी सभा पुर्ण झालेल्या सभेचे इतिवृत वाचुन कायम करणे .

ठराव क्र १४४- दि . ०५/०५/२०२५ रोजी सकाळी ११.०० वा.पुर्ण झालेल्या सभेचे इतिवृत कायम करणे

व संबंधित खात्याने केलेल्या कार्यवाहीचा आढावा घेणेत येऊन त्यावर महत्वाचे कार्यवाहीच्या मुद्यावर संबंधित विभागाने केलेल्या कार्यवाहीचा आढावा घेऊन त्यांची नोंद घेणेत आली.संबंधित सर्व खातेप्रमुखांनी सभेतील कामकाजानुसार तातडीने उचित कार्यवाही करुन अनुपालन सादर करावे.

विषय क्रमांक २- बांधकाम दक्षिण विभागाने प्रस्तावित केल्यानुसार सन१९७६ पुर्वीच्या जायकवाडी

प्रकल्पांतर्गत, शेवगांव तालुक्यातील पुनर्वसित गावठाणामध्ये पुरवावयाच्या नागरी सुविधा कामासाठी ना- हरकत प्रमाणपत्र देणेबाबत.अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या अखत्यारीत असलेल्या शेवगाव तालुक्यातील , जायकवाडी प्रकल्पांतर्गत, शेवगांव तालुक्यांतील पुनर्वसित गावठाणामध्ये पुरवावयाच्या नागरी सुविधांच्या कामासाठी, ना- हरकत प्रमाणपत्र देणेबाबत कार्यकारी अभियंता, मुळा पाटबंधारे विभाग, अहिल्यानगर यांनी त्यांच्याकडील पत्र जा.क्र. मुपावि/प्रशा ४ /१८३२/सन२०२५ दि. ११/०४/२०२५ अन्वये मागणी करणेत आलेली आहे.

तसेच उपअभियंता, जि. प. सा. बां. उपविभाग शेवगाव यांनी त्यांचेकडील पत्र जा.क्र.वशि/चिशा/८४/२०२५ दि.२९/५/२५ अन्वये सादर केलेल्या अहवालानुसार सन १९७६ पूर्वीच्या जायकवाडी प्रकल्पांतर्गत शेवगाव/नेवासा तालुक्यातील पुनर्वसित गावठाणांमध्ये पुरवावयाच्या नागरी सुविधांच्या अंतर्गत येणा-या सोबतच्या यादितील प्रस्तावित कामे ही या कार्यालया मार्फत कोणत्याही योजनेतुन प्रस्तावित वा मंजुर नाहीत, त्यामुळे या कार्यालयाची सदरचे कामास हरकत नाही असे कळविले आहे.

तथापि, शेवगाव तालुक्यातील ३२ कामांना परवानगी व ना-हरकत देणेकामी, जि. प. स्थायी समिती सभेची मान्यता घेणे श्रेयस्कर राहील. करीता, सदर विषय स्थायी समिती सभेपुढे ठेवण्यासाठी मान्यता मिळावी ही विनंती.

विभागाचा अभिप्राय - जिल्हा परिषदेच्या मालकीच्या रस्त्योवर जायकवाडी प्रकल्पांतर्गत, शेवगांव तालुक्यातील पुनर्वसित गावठाणामध्ये पुरवावयाच्या नागरी सुविधांच्या कामासाठी ना- हरकत देणेकामी, जिल्हा परिषद स्थायी समिती सभेची मान्यता घेणे आवश्यक वाटते .

ठराव क्र १४५- अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या अखत्यारीत असलेल्या शेवगाव तालुक्यातील , जायकवाडी प्रकल्पांतर्गत, शेवगांव तालुक्यांतील पुनर्वसित गावठाणामध्ये पुरवावयाच्या नागरी सुविधांच्या कामासाठी, ना- हरकत

प्रमाणपत्र देणेबाबत कार्यकारी अभियंता, मुळा पाटबंधारे विभाग, अहिल्यानगर यांनी त्यांच्याकडील पत्र जा.क्र. मुपावि/प्रशा - ४ /१८३२/सन२०२५ दि. ११/०४/२०२५ अन्वये मागणी करणेत आलेली आहे.

तसेच उपअभियंता, जि. प. सा. बां. उपविभाग शेवगाव यांनी त्यांचेकडील पत्र जा.क्र.वशि/चिशा/८४/२०२५ दि.२९/५/२५ अन्वये सादर केलेल्या अहवालानुसार सन १९७६ पूर्वीच्या जायकवाडी प्रकल्पांतर्गत शेवगाव/नेवासा तालुक्यातील पुनर्वसित गावठाणांमध्ये पुरवावयाच्या नागरी सुविधांच्या अंतर्गत येणा-या सोबतच्या यादितील प्रस्तावित कामे ही या कार्यालया मार्फत कोणत्याही योजनेतुन प्रस्तावित वा मंजुर नाहीत, त्यामुळे या कार्यालयाची सदरचे कामास हरकत नाही असे कळविले आहे.

तथापि, शेवगाव तालुक्यातील ३२ कामांना परवानगी व ना-हरकत देणेकामी, जि. प. स्थायी समिती सभेस शिफारस करणेत येत आहे.

विषय क्रमांक ३- जिल्हा परिषद सेस फंड योजनेतून सन २०२५-२६मधून मंजुर अनुदानातुन प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रांकरीता आणि आयुर्वेदिक डिस्पेन्सरी करीता औषधे साहित्य सामुग्री खरेदी खर्चास प्रशासकिय मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावना- अहिल्यानगर जिल्हा परिषद आरोग्य विभागांतर्गत आदिवासी व बिगर आदिवासी क्षेत्रामध्ये एकूण १०४ प्राथमिक आरोग्य केंद्रे व ५९८ उपकेंद्रे ०२ आयुर्वेदिक दवाखाने,व ०५ प्राथमिक आरोग्य पथके कार्यान्वीत आहेत. सदर आरोग्य संस्थामार्फत ग्रामीण भागातील जनतेला आरोग्य सुविधा देण्याचे काम चालु आहे. प्रा.आ.केंद्र/उपकेंद्रा करीता सन २०२५-२६ करीता जिल्हा परिषद सेस फंड योजनेअंतर्गत औषध, साहीत्य सामुग्री,ई .खरेदीसाठी खालील प्रमाणे नियतव्यय मंजुर केलेला आहे.

अहिल्यानगर जिल्हा परिषद आरोग्य विभागांतर्गत आदिवासी व बिगर आदिवासी क्षेत्रामध्ये एकूण १०४ प्राथमिक आरोग्य केंद्रे व ५९८ उपकेंद्रे ०२ आयुर्वेदिक दवाखाने,व ०५ प्राथमिक आरोग्य पथके कार्यान्वीत आहेत. सदर आरोग्य संस्थामार्फत ग्रामीण भागातील जनतेला आरोग्य सुविधा देण्याचे काम चालु आहे. प्रा.आ.केंद्र/उपकेंद्रा करीता सन २०२५-२६ करीता जिल्हा परिषद सेस फंड योजनेअंतर्गत औषध, साहीत्य सामुग्री,ई .खरेदीसाठी खालील प्रमाणे नियतव्यय मंजुर केलेला आहे..

तक्ता अ-

अ.क्र.	योजनेचे नाव	लेखाशिर्ष	मंजूर अनुदान / प्राप्त निधी
१	प्रा.आ.केंद्रांसाठी साथरोग निवारणार्थ औषध खरेदी	८९०१	१० लक्ष
२	पिसाळलेले कुत्रे चावल्यावर ARV लस औषध खरेदी	८९०२	५ लक्ष
३	राष्ट्रीय आपत्तीच्या वेळी मदत कार्यासाठी औषध खरेदी	८९०४	८ लक्ष
४	प्रा.आ. केंद्रांसाठी आयुर्वेदिक औषध खरेदी	८९१५	१० लक्ष
५	प्रा. आ. केंद्रांना सर्पदंश लसीचा पुरवठा करणे	८९१७	२ लक्ष
		एकूण	३५ लक्ष

उपरोक्त अनुदानातून प्रा. आ. केंद्र व उपकेंद्र करिता आणि आयुर्वेदिक डिस्पेन्सरी करीता आवश्यक औषध साहित्यसामुग्री, ई. खरेदीची गरज भांडार विभागातील औषधांचा शिल्लक साठा मा.संचालक /शासन स्तरावरून होणारा औषधांचा पुरवठा व भौगोलिक परिस्थिती ई.बाबींचा विचार करून औषधे व साहित्य साधन सामुग्रीची खरेदी करून प्राथमिक आरोग्य केंद्रांना /उपकेंद्रांना,आयुर्वेदिक डिस्पेन्सरी यांना औषध साठा मागणीनुसार पुरविण्यात येईल .औषध ,साहित्य सामुग्री खरेदीची कार्यवाही शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या सूचनांनुसार,शासन निर्णय उद्योग ऊर्जा व कामगार विभाग दिनांक- ०१ डिसेंबर २०१६ ,शासन निर्णय दिनांक -०७ मे २०२१ चा अवलंब करून करण्यात येईल .

उपरोक्त मंजूर अनुदानातून प्रशासकीय मान्यता घेणेसाठी महाराष्ट्र शासन ,ग्रामविकास विभाग ,शा.नि.क्र.झेपिए -२०१६/प्र .क्र . ५६/वित्त-९ मुंबई ३२ दिनांक -०७/१०/२०१७ अन्वये सदर विषय मा.जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा /स्थायी समिती सभेत मान्यतेस्तव सादर करणे आवश्यक आहे .

तथापि ,महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग राजपत्र असाधारण क्र . २६ दिनांक ११ मार्च २०२२ अन्वये कार्यकाल दिनांक २०/०३/२०२२ रोजी संपुष्टात आला आहे .त्यामध्ये जिल्हा परिषद अ. नगर चा समावेश आहे. तसेच सामान्य प्रशासन विभाग ,मुंबई १ जा.क्र. सा.प्र.वि १/परिषद /३३४/२०२२ अ. नगर दिनांक २८/०३/२०२२ अन्वये प्रशासक कालावधीत जिल्हा परिषद जिल्हा परिषद स्तरावरील विविध विकास कामे व योजना अंबलबजावणीसाठी निर्णय घेण्यासाठी विविध स्तरांवर सल्लागार समिती नियुक्ती केली आहे .तरी सदरचा विषय समिती समोर मान्यतेस्तव सविनय सादर

ठराव क्र १४६- उपरोक्त नमूद केलेल्या तक्ता अ मधील सन २०२५-२६मधील जिल्हा परिषद सेस

योजना मधील उपलब्ध मंजूर अनुदानातून, प्रा.आ.केंद्र व उपकेंद्र करिता आणि आयुर्वेदिक डिस्पेन्सरी करीता आवश्यक औषध साहित्यसामुग्री,ई. खरेदी प्रक्रियेसाठी आरोग्य समितीच्या सल्लागार समितीमध्ये योजनानिहाय प्रशासकीय मान्यतास्तव विषयास मंजुरी घेण्यात आलेली असून सामान्य प्रशासन विभाग ,मुंबई १ जा.क्र. सा.प्र.वि १/परिषद /३३४/२०२२ अहिल्यानगर दिनांक- २८/०३/२०२२ अन्वये प्रशासक कालावधीत जिल्हा परिषद जिल्हा परिषद स्तरावरील विविध विकास कामे व योजना अंबलबजावणीसाठी निर्णय घेण्यासाठी विविध स्तरांवर सल्लागार समिती नियुक्ती केलीली आहे. त्याअनुषंगाने ,जिल्हा परिषद सेस फंड योजना सन २०२५-२६मधील उपलब्ध असलेल्या अनुदानातून एकूण रक्कम रु. ३५ लक्ष औषधी खरेदीसाठी खरेदी खर्चास मा. जिल्हा परिषद स्थायी समिती सभा मान्यता देत आहे .

विषय क्रमांक ४- ग्रामपंचायत मौजे साकत, ता.जामखेड, जि.अहिल्यानगर चे विभाजन करुन कोल्हेवाडी स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करणे बाबत.

प्रस्तावना :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती जामखेड यांचे कार्यालयाकडुन मौजे साकत, ता.जामखेड चे विभाजन करुन मौजे कोल्हेवाडी येथे स्वतंत्र ग्रामपंचायत स्था०पना करणेचा प्रस्ताव सादर केलेला आहे. सदर प्रस्तावाची छाननी केली असता दिनांक शासन निर्णय १२ फेब्रुवारी २००४ व २ सप्टेंबर २००६ नुसार साकत व कोल्हेवाडी हे महसुली गावे आहेत. सन २०११ च्या लोकसंख्येनुसार साकत गावाची ५३९९ व कोल्हेवाडीे गावाची ११०७ एवढी लोकसंख्या असुन कोल्हेवाडी गावाचे दरडोई उत्पन्न १६६/- इतके आहे. सदर विभाजनाबाबतचा प्रस्ताव मा.विभागीय आयुक्त नाशिक विभाग नाशिक यांचेमार्फत शासनास स्थायी समितीचे ठरावासह सादर करावयाचा आहे.

नियमातील तरतुद :- शासनाकडील पत्र क्रं. .व्हीपीएम/२६०३/प्र.क्र.४२१५/पंरा-४(२२) दि०२/०९/२००६ मध्ये नमुद केलेनुसार महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ मधील कलम ४, तसेच ग्राम विकास व जलसंधारण विभागाकडील शासन निर्णय दि.१२ फेब्रुवारी २००४ नुसार प्रस्तावासोबत विदयमान स्थायी समितीचा ठराव जोडणे आवश्यक आहे. परंतु महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग एक-अ-मध्य उप-विभाग, ग्रामविकास विभाग, बांधकाम भवन, २५, मर्झबन पथ, फोर्ट, मुंबई ४०० ००१, दिनांक ११ मार्च २०२२ अन्वये जिल्हा परिषद अहिल्यानगर मध्ये मा.अध्यक्ष, मा.उपाध्यक्ष, विषय समित्यांचे मा.सभापती सर्व यांचा कार्यकाल समाप्त झाल्याने मा.मुख्य कार्यकारी अधिकारी , जिल्हा परिषद अहिल्यानगर यांची प्रशासक म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे.

विभागाचे अभिप्राय:- वरीलप्रमाणे ग्रामपंचायत साकत चे विभाजन करुन कोल्हेवाडी येथे स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करणेबाबतचा प्रस्ताव प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर यांचे शिफारशीसाठी सादर करणेत येत असुन मान्यता मिळणेस विनंती आहे.

ठराव क्रमांक १४७- नियमातील तरतुदी (संदर्भ)

१. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मधील कलम ४,

२. ग्राम विकास व जलसंधारण विभागाकडील शासन परिपत्रक दिनांक १२ फेब्रुवारी २००४.

३. महाराष्ट्र शासन राजपत्र,असाधारण भाग एक अ-मध्य उप-विभाग,ग्रामविकास विभाग,बांधकाम भवन,२५,मर्झबन पथ,फोर्ट,मुंबई ४००००१, दिनांक ११ मार्च २०२२

४. ग्रामस्थ मौजे कोल्हेवाडी, ता.जामखेड यांचे मागणी पत्र.

५. गटविकास अधिकारी, पंचायत समिती, जामखेड यांचेकडील प्रस्ताव दिनांक ०२/०६/२०२५.

संदर्भ क्र. १ व संदर्भ २ मधील (इ) एखाद्या जिल्हा परिषदेच्या ठिकाणी, स्थायी समिती अस्तीत्वात नसल्यास, प्रशासकाने केलेला ठराव ग्राह्य धरण्यात येईल अशी तरतुद आहे. उक्त संदर्भ क्र. ३ अन्वये मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर यांची प्रशासक म्हणून नेमणुक करण्यात आली आहे. तसेच संदर्भ ४ अन्वये मौजे कोल्हेवाडी, ता.जामखेड येथील ग्रामस्थांच्या मागणी पत्रासह ग्रामपंचायतीने गट विकास अधिकारी, पंचायत समिती जामखेड यांचे कार्यालयास प्रस्ताव सादर केल्याने संदर्भ क्र. ०५ अन्वये, गट विकास अधिकारी, पंचायत समिती जामखेड यांनी **दिनांक** ०२/०६/२०२५ रोजी या कार्यालयास ग्रामपंचायत मौजे साकत ता.जामखेड चे विभाजन करुन मौजे कोल्हेवाडी ता.जामखेड स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापना करणेचा प्रस्ताव सादर केलेला आहे.

वरिल तरतुदींचे अवलोकन करता, ग्रामपंचायत मौजे साकत ता.जामखेड चे विभाजन करुन मौजे कोल्हेवाडी ता.जामखेड स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापना करणेस शिफारस करणेत येत आहे.

सचिव तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी,(सा.)
जिल्हा परिषद, अहिल्यानगर

प्रशासक तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर